दैनिक
# दिव्य मातृछाया
बुलडाणा

गुरुवार, दि. १२ जून २०२५

● वर्ष : चौथे ● अंक : ३५ ● पाने : ४ ● RNI.NO. MAHMAR/2022/87711 www.matruchhaya.in ● मुख्य संपादक : सादिक कुरेशी 9420647272 ● कार्यकारी संपादक : आसिफ गवळी 9767681555

# आज उपमुख्यमंत्री अजितदादांसह अनेक मंत्री खामगावात

## माजी आमदार सानंदांसह २५ हजार कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी पक्षप्रवेश सोहळा

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**खामगाव, दि. ११ जून :** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे उद्या खामगाव शहराच्या दौऱ्यावर येत असुन उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ९ मंत्री महोदयांच्या उपस्थितीमध्ये सायंकाळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर परिषद मैदान येथे राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्त्यांचा भव्य संकल्प मेळावा व पक्ष प्रवेश सोहळा संपन्न होणार आहे. याप्रसंगी खामगाव विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांच्यासह अनेक आजी माजी जिल्हा परिषद, पंचायत समिती जनप्रतिनिधी यांच्यासह बुलढाणा जिल्हयातील अनेक दिग्गज नेते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये जाहिर प्रवेश घेणार आहे. तसेच याप्रसंगी खामगाव विधानसभा मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ११ हजार क्रियाशिल सदस्यांचे नाव नोंदणी करून त्यांच्या नावांची यादी प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांना सुपुर्द करण्यात येणार आहे.





यत्र-तत्र-सर्वत्र राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नंबर वन वर करण्यासाठी, महात्मा गांधी-शाहू-फुले आंबेडकर व मौलाना अबुल कलाम आझाद यांचे विचार घरा-घरापर्यंत रुजविण्यासाठी, जनतेला न्याय हक्क मिळवून देण्यासाठी, आगामी निवडणुकीत प्रत्येक संस्थेंवर राष्ट्रवादी काँग्रेस व मित्र पक्षाचा झेंडा फडकविण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा अश्वमेध चौफेर जावा व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शंखनादाची सुरुवात खामगाव विधानसभा मतदार संघातून सुरु व्हावी याकरीता खामगाव येथे राष्ट्रवादी काँग्रेसचा भव्य संकल्प मेळावा व पक्ष प्रवेश सोहळा आयोजित करण्यात आला आहे. याप्रसंगी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सोबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा खासदार प्रफुलभाई पटेल, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे, महाराष्ट्र राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, उच्च तंत्र शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, महिला व बालविकास मंत्री अदितीताई तटकरे, बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद जाधव पाटील, उद्योग व सार्वजनिक बांधकाम विभागाचे राज्यमंत्री इंद्रनील नाईक, अध्यक्ष महिला आयोग महाराष्ट्र राज्य रुप-सदस्य, ।लीताई चाकणकर, अमरावती विभागाचे समन्वयक तथा विधान परिषद सदस्य संजय खोडके, विधान परिषद सदस्य अमोल मिटकरी, आमदार मनोज कायंदे, महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष सुरज चव्हाण, यांच्यासह अनेक खासदार, आमदार, विधान परिषद सदस्य व प्रदेश पातळी-वरील राष्ट्रवादी काँग्रेसचे मान्यवर नेते मंडळींची उपस्थिती लाभणार आहे.

आज या कार्यक्रमा दरम्यान मुंबई येथील अजय साटम यांचा ६० कलावंतांचा संच असलेला कलाकारांचा मराठी पाऊल पडते पुढे हा सांस्कृतिक कार्यक्रम सुध्दा आयोजित करण्यात आला आहे. या भव्य संकल्प मेळाव्याप्रसंगी उपस्थितांना २५ हजार भिंतीवरील घडयाळी आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे निशाण असलेले ५ हजार छत्र्या वितरीत करण्यात येणार आहे. उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या खामगाव दौऱ्यासाठी मतदार संघात माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांच्या मार्गदर्शनाखाली ठिक-ठिकाणी जय्यत तयारी करण्यात येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या तिरंगी झेंड्यामुळे खामगाव शहर तिरंगामय बनले आहे तसेच लावण्यात आलेली विद्युत रोषणाई नागरीकांचे लक्ष वेधुन घेत आहे.

♦ अजित पवार यांचे खामगाव शहरात आगमन झाल्यानंतर शहरातील प्रमुख मार्गाने रॅली काढुन थोर महापुरुषांच्या पुतळ्यांना माल्यार्पण करुन अभिवादन करण्यात येणार आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेकर नगर परिषद मैदान येथील भव्य प्रांगणात भव्य संकल्प मेळावा व प्रवेश सोहळा संपन्न होणार आहे. त्यानंतर श्री देवजी खिमजी मंगल कार्यालय येथे बुलढाणा जिल्हयातील सर्व अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक व पत्रकार परिषद सुध्दा घेण्यात येणार आहे.

♦ राणा दिलीपकुमार सानंदा यांचे सानंदा निकेतन येथे सदिच्छा भेट व स्नेह भोजनानंतर ना. अजितदादा पवार हे शे गावकडे प्रयाण करतील व रात्री शेगाव येथे आनंद विहार भक्त निवास येथे मुक्कामी राहुन शुक्रवार रोजी संत गजानन महाराजांचे समाधी दर्शन घेवुन पुढील नियोजीत कार्यक्रमासाठी प्रस्थान करतील खामगाव येथे आयोजित भव्य संकल्प मेळावा व पक्ष प्रवेश सोहळ्यामध्ये जवळपास २५ हजार लोक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश घेणार आहेत.

♦ या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी खामगाव विधानसभा मतदार संघातील व बुलढाणा जिल्हयातील सर्व राष्ट्रवादी काँग्रेस प्रेमी जनतेने या कार्यक्रमाला आपल्या वाहनांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे झेंडे लावुन वाजत-गाजत हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अॅड. नाझेर काझी, जिल्हा कार्याध्यक्ष शंतनु बोंद्रे, खामगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुभाष पेसोडे, राष्ट्रवादी काँग्रेस सेवादलाचे जिल्हाध्यक्ष देवेंद्रदादा देशमुख, खामगाव विधानसभा अध्यक्ष पुंजाजी टिकार, खामगाव तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अंबादास हिंगणे यांच्यासह बुलढाणा जिल्हयातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# उमरखेड बाजार समितीच्या ऐतिहासिक विजयाचे शिल्पकार - लोकनेते नितीन भुतडा!

● दिव्य मातृछाया
● अवधूत खडककर

**उमरखेड :** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत दणदणीत विजय मिळवत सामान्य माणसाच्या नेतृत्वाने नव्या इतिहासाची नोंद केली आहे. या ऐतिहासिक यशाचे खरे शिल्पकार म्हणजे जिल्हा समन्वयक नितीन भुतडा, एक असा लोकनेता ज्यांनी कधीही पराभव मानलेला नाही. त्यांच्या जीवनातील प्रत्येक लढाई ही समाजासाठी, शेतकऱ्यांसाठी आणि गोरगरीब जनतेसाठी होती – आणि म्हणूनच आज जनता त्यांच्यावर निस्सीम प्रेम करते.



नितीन भुतडा, हे नाव म्हणजे प्रामाणिकपणा, जिद्द आणि खंबीर नेतृत्वाचे प्रतीक आहे. त्यांनी आजपर्यंत कोणत्याही पदासाठी पैसे, प्रतिष्ठा किंवा दबाव यांचा आधार न घेता केवळ जनतेच्या विश्वासावर आपली वाटचाल केली आहे. म्हणूनच आज लाखमोलाची मदत घेऊनही अनेकांनी हार पत्करावी लागली, पण नितीन भुतडा यांना हरवणं कुणाच्याही शक्तीबाहेरचं आहे. कारण ते जनतेने घडवलेले, नव्हे तर जनतेच्या सानिध्यात घडवले गेलेले लोकनेते आहेत.

नितीन भुतडा यांच्या सारख्या सामाजिक, अभ्यासू, आणि सर्वसामान्यांच्या मनात स्थान मिळवलेल्या नेत्यानं पुन्हा एकदा दाखवून दिलं की – जे सत्यासाठी लढतात, त्यांच्याच पाठीमागे जनतेचा विश्वास उभा असतो.

"पैशाने लोक विकत घेता येतात, पण माणसाच्या मनातील जागा केवळ विश्वासाने जिंकता येते," हे नितीनजी च्या या विजयाने अधोरेखित केले आहे.

♦ या विजयानंतर उमरखेड बाजार समितीचे नवे सभापती मा. कृष्णा पाटील देवसरकर आणि संघर्षशील कार्यकर्ते श्रीपाल भाऊ आडे यांचे देखील मनःपूर्वक अभिनंदन. या दोघांनीही नितीन भाऊंच्या नेतृत्वाखाली सामंजस्य, निष्ठा आणि समाजासाठी असलेली तळमळ या गुणांद्वारे आपली निवड निश्चित केली आहे.

♦ हा विजय केवळ एक निवडणूक जिंकल्याचा आनंद नसून, तो गोरगरिबांच्या, शेतकऱ्यांच्या आणि उपेक्षित जनतेच्या आशेचा विजय आहे.

# शोले स्टाईल' आंदोलनाने खळबळ; बच्चू कडू यांच्या समर्थनार्थ कार्यकर्ते चढले 'टावर'वर

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**मलकापूर :** येथे प्रहार जनशक्ती पक्षाचे सर्वेसर्वा माजी आमदार बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांच्या विविध मागण्याकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी गुरुकुंज मोझरी (जि.अमरावती) येथे बेमुदत उपोषण सुरु केले आहे. आंदोलनाकडे शासन आणि प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याच्या निषेधार्थ ठिकठिकाणी निषेध व्यक्त करण्यात येत आहे.



बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर येथील बच्चू कडू यांचे समर्थक तथा जिल्हा उपप्रमुख अजय टप यांनी आज बुधवारी अचानक 'टावर' आंदोलन सुरु केले. प्रहार नेते बच्चू कडू यांच्या आंदोलनाच्या समर्थनासाठी आणि शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे 'शोले स्टाईल' आंदोलन करण्यात येत आहे.

प्रशासनाने तात्काळ बच्चू कडू यांच्या मागण्यांकडे लक्ष देऊन चर्चा करावी, अन्यथा रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर जनआंदोलन उभे केले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. या अनोख्या आंदोलनामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

पोलिस व प्रशासनाने घटनास्थळी धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली. यावेळी प्रहार जनशक्ती पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बच्चू कडू हे गेल्या चार दिवसांपासून शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी व दिव्यांग बांधवांच्या न्याय मागण्यांसाठी उपोषण करत आहेत. मात्र, शासन व प्रशासनाकडून त्यांच्या आंदोलनाची योग्य दखल घेतली जात नसल्याच्या निषेधार्थ अजय टप यांनी हे टोकाचे पाऊल उचलले.

♦ अजय टप यांनी आज मलकापूर येथील तहसील चौकातील बीएसएनएलच्या टॉवरवर चढून 'शोले स्टाईल' आंदोलन करत सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. हे आंदोलन पक्षप्रमुख बच्चू कडू यांच्या सुरू असलेल्या अन्नत्याग आंदोलनाच्या समर्थनार्थ करण्यात आले. टॉवरवरूनच त्यांनी प्रशासनाचा निषेध करत भविष्यात यापेक्षाही तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला.

# शासनाच्या योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवा!

## एसडीओ शरद पाटील यांचे अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवाहन

● दिव्य मातृछाया
● शहर प्रतिनिधी

**बुलडाणा :** शासनाच्या विविध कल्याणकारी योजना शेतकऱ्यांपर्यंत व सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्याकरिता सर्वाधिकारी व कर्मचाऱ्यांनी पुढाकार घ्यावा व जनतेची कामे लवकरात लवकर करून द्यावी असे आवाहन बुलढाणा व उपविभागीय अधिकारी शरद पाटील यांनी केले आहे.



छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान योजना अंतर्गत देऊळघाट महसूल मंडळातील हातडी बुद्रुक येथे आज दिनांक 11 जून रोजी राजस्व अभियान कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. या महाराजस्व अभियान अंतर्गत सामान्य नागरिकांना महसूल खात्यातील संबंधित सर्व प्रकारचे विद्यार्थ्यांना शैक्षणिक कामासाठी लागणारे प्रमाणपत्र तसेच शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी लागणारे सातबारा उतारा व इतर दस्त उपलब्ध करून देण्यात आले.

तसेच शासनाच्या विविध योजना अंतर्गत संजय गांधी, श्रावणबाळ निराधार लाभार्थी यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. पुरवठा विभागाकडून नागरिकांना जागेवरच रेशन कार्ड वाटप करण्यात आले तसेच विविध विभागाचे अर्ज व घरकुल योजना अर्ज स्वीकारण्यात आले.कृषी विभाग, भूमी अभिलेख विभाग, आरोग्य विभागा मार्फत गरोदर माता व बालके यांचे आरोग्य शिबिर आयोजित करून तपासण्या करण्यात आले. सदर कार्यक्रमास बुलडाणा उपविभागीय अधिकारी शरद पाटील तसेच नायब तहसीलदार शशिकांत वाघ पुरवठा अधिकारी नीलिमा उरकुंडे देऊळघाट तलाठी विनोद कोळसे, सावळे,पाटील मॅडम,इतवारे,भलावी मॅडम मंडळातील पोलीस पाटील सरपंच व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर जुनी नगर परिषद प्रांगणात संपन्न

● दिव्य मातृछाया
● विजय जाधव

**देऊळगाव राजा :** दि. ११ जून रोजी दुपारी १ वाजता जुनी नगर परिषद प्रांगणात महाराष्ट्र शासना अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर २०१५ संपन्न झाले . 'या शिबिरामध्ये विविध प्रशासकीय विभागातील शासनाच्या विविध योजनांची माहिती अधिकाऱ्यांनी दिली व असंख्य नागरिकांनी याचा लाभ घेतला तहसीलदार वैशाली डोंगरजाळ यांच्या अध्यक्षतेमध्ये शिबिर संपन्न झाले.

जिल्हाधिकारी बुलढाणा डॉ किरण पाटील यांच्या निर्देशानुसार तथा उपविभागीय अधिकारी प्रा संजय खडसे सि .राजा यांच्या मार्गदर्शनात व तहसीलदार वैशाली डोंगरजाळ यांच्या अध्यक्षतेखाली राजस्व मंडळ देऊळगाव राजा यांच्या वतीने न .प . प्रांगणात महाराष्ट्र शासना अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर २०२५ चे आयोजन करण्यात आले होते .या शिबिरामध्ये विविध प्रशासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी आपल्या विभागातील सेवा घेऊन उपस्थित होते यामध्ये महसूल विभाग , पंचायत समिती, कृषी विभाग, आरोग्य विभाग, भूमी अभिलेख, पशुधन विकास विभाग , दुय्यम निबंधक, विधी सेवा विभाग, पुरवठा विभाग , आदीसह इतर विभागाने सहभाग घेतला होता. आपल्या विभागातील योजनांची माहिती संबंधितांनी दिली व लाभार्थ्यांची कामे पूर्ण केली.

सदर शिबिराचे आयोजन जिल्हाधिकारी यांच्या निर्देशाने उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांच्या मार्गदर्शनात, राजस्व विभाग देऊळगाव राजाचे मंडळ अधिकारी रामदास मांटे, तलाठी देशपांडे , खरात, वाघ मॅडम, रगडे मॅडम, सुहास जोशी आदींनी शिबीर यशस्वीतेसाठी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरज गुप्ता तर आभार प्रदर्शन रामदास मांटे यांनी केले. या शिबिरामध्ये लाभार्थी मोठ्या संख्येत उपस्थित होते.




♦ यावेळी लाभार्थ्यांना विविध योजनेचे लाभ तसेच प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आले. सदर शिबिराच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार वैशाली डोंगरजाळ हे होते. तर उपस्थितीमध्ये नायब तहसीलदार घोटकर, नायब तहसीलदार सायली जाधव, गटविकास अधिकारी मुकेश मोहोर, मंडळ अधिकारी रामदास मान्टे, आरोग्य अधिकारी महेश वाळूकर, पशुधन अधिकारी डॉ चिरफरे, कृषी विभागाचे शिंगणे, विधी सेवा समिती सदस्य श्रीमती सरस्वतीताई टेकाळे, जांभोरा सरपंच डुरे, जेष्ठ पत्रकार सुरज गुप्ता, भूमि अभिलेखचे खेडकर, पुरवठा विभागाचे फाले आदींचे प्रमुख उपस्थिती होती. विविध प्रशासकीय विभागाचे अधिकारी कर्मचारी व स्वस्त धान्य दुकानदार असोशियन आणि वाईंडर असोशियनचे पदाधिकारी उपस्थित होते.

# सोलर घोटाळ्यात गुन्हे दाखल करा

## जिल्हाधिकाऱ्यांनी त्वरित कारवाईचे दिले निर्देश

## फरदापुर सह जिल्ह्यातील अतिक्रमित रस्ते मोकळे करा, अन्यथा लॉग मार्च काढू ; आझाद हिंद संघटनेचे ॲड .सतीशचंद्र रोठेंचा प्रशासनाला इशारा

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**मोताळा :** मोताळा नगर पंचायत हद्दीमध्ये झालेल्या सोलर घोटाळ्याबाबत सीओ गणेश पांडे यांनी बोरखेडी पोलीस ठाण्यात कंपनी विरोधात तक्रार दाखल केल्यानंतर 12 ते 13 दिवस उलटून ही पोलिसांनी गुन्हे दाखल केले नसल्याने तात्काळ सोलर कंपनी विरोधात गुन्हे दाखल करावे.

ग्राम फरदापुर सह जिल्ह्यातील शेत रस्ते, पांदण रस्ते, अतिक्रमण मुक्त करावे, जिल्ह्यातील साफसफाई कंत्राटदारावर कारवाई करावी, सारोळा मारोती ग्रामसेवक विलास शिवदे यांना निलंबित करावे, चहाचे कप प्लास्टिक बंदी अंमलबजावणी करावी, आझाद हिंद च्या कार्यकर्त्यावरील बनावट खोटे गुन्हे खारीज करावे यासह इतर मागण्यांची त्वरित पूर्तता करावी. अन्यथा मोताळा ते बुलढाणा पर्यंत पैदल लॉग मार्च काढू असा इशारा आझाद हिंद संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड.सतीशचंद्र रोठेंनी निवेदनाद्वारे दिला आहे.



**फरदापुर व मोताळा तालुक्यातील रस्ते अतिक्रमण मुक्त करावे**

♦ ग्राम फरदापुर सह मोताळा तालुक्यातील शेत रस्ते, पांदण रस्ते, गाव रस्ते अतिक्रम मुक्त करावे. यामुळे तालुक्यातील प्रत्येक गावात शेतकऱ्यांचे वादविवाद होत आहे. भांडण होत आहे. दैनंदिन मागणी करूनही यावर अद्याप कोणतेही कारवाई करण्यात आलेली नाही. करिता संबंधितावर कारवाई करावी. फरदापुर सह तालुक्यातील शेत रस्ते अतिक्रमण मुक्त करावे. अतिक्रमण धारकांना पाठीशी घालणाऱ्या ग्रामसेवक विलास शिवदेना निलंबित करावे आदी प्रमुख मागण्यांना घेऊन आझाद हिंद शेतकरी संघटना, ग्राम स्वराज्य समिती,राष्ट्रीय बजरंग दल व ग्रामस्थांच्या वतीने मोताळा ते बुलढाणा लॉग मार्च काढण्याचा इशारा देण्यात आला आहे.

### प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या तक्रारीवरही पोलिसांची कारवाई नाही

मे.ओ 2 रिन्यूबेवल एनर्जी प्रा. ली.या कंपनीने मोताळा नगर पंचायत हद्दीमध्ये व्यावसायिक सोलर प्लांट उभा केला आहे.हा प्लांट उभा करण्यासाठी मोताळा नगर पंचायत यांची बनावट एनओसी तयार करण्यात आली आहे. एनओसी वर सीओंची बनावट सही व बनावट शिक्क्याचा वापर केला आहे.पंचायतचा टैक्स बुडवण्यासाठी बोगस एनओसी तयार करून फसवणूक केल्याची बोराखेडी पोलीस ठाण्यात सीओ गणेश पांडे यांनी एका कर्मचाऱ्यांला प्राधिकृत करून 28 मे रोजी तक्रार दाखल केली. असे असतांना 12 ते 13 दिवस उलटून ही पोलिसांनी गुन्हे दाखल केले नाही.

### जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटलांनी त्वरित कारवाईचे निर्देश दिले

♦ आज 11 जून रोजी आझाद हिंद शेतकरी संघटना, ग्राम स्वराज्य समिती तथा राष्ट्रीय बजरंग दलाच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी यांची भेट घेत मागण्यांच्या अनुषंगाने बैठक घेत चर्चा केली. त्यानंतर जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी संबंधित विभाग प्रमुखांना बोलवून निवेदनातील मागण्यांच्या अनुषंगाने सर्वकश माहिती घेतले. त्यानंतर लगेच संबंधितावर कारवाई करण्याचे निर्देश दिले. तर लवकरच मागण्यांची पूर्तता करण्याचे आश्वासन शिष्टमंडळाला दिले.

### जिल्हा प्रशासनामार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आयुक्तांना निवेदन सादर

♦ जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील, जिल्हा परिषद सीईओ गुलाबराव खरात,कॅफो प्रकाश राठोड, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे निरीक्षक अशोक लांडे यांची भेट घेत जिल्हा प्रशासनामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, एकनाथराव शिंदे, पोलीस महानिरीक्षक अमरावती, अमरावती विभागीय आयुक्त यांना 11 जून रोजी निवेदन सादर केले आहे.यावेळी ग्राम स्वराज्य समिती चे कमलाकर व्यवहारे, राष्ट्रीय बजरंग दलाचे जिल्हाध्यक्ष सुशांत पाटील आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## बाल कामगार प्रथा विरोधी जनजागृती अभियान; विविध कार्यक्रमाचे आयोजन

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन



**बुलडाणा, दि. 11 :** जागतिक बालकामगार विरोधी दिन दि. 12 जुन रोजी संपूर्ण जगात पाळला जातो. हा दिवस 2002 पासून पाळण्यात येत असून या दिनाचे औचित्य साधून सरकारी कामगार अधिकारी म.तु. जाधव यांच्याद्वारे बाल कामगार प्रथा विरोधी जनजागृती अभियान व सप्ताह जिल्ह्यामध्ये राबविण्यात येत आहे.

आमच्याकडे बालकामगार काम करीत नाहीत व यापुढेही बालकामगार ठेवणार नाही, असे हमीपत्र व्यापारी वर्गाकडून भरुन घेण्यात येईल. कोणत्याही आस्थापनेने 18 वर्षाखालील बालक किंवा किशोरवयीन बालकास आपल्या आस्थापनेवर कामास ठेवू नये, ठेवल्यास सदर आस्थापनेवर कायदेशिर कारवाई करण्यात येईल लहान वयात काम केल्यामुळे बालकांच्या त्वचा, श्वसनमार्ग संस्था, मेंदु, जठर संस्था यावर विपरीत परीणाम होतो. त्यांची मानसिक, शारीरीक व बौध्दीक वाढ खुंटते.

चांगले जीवन जगण्याचा त्यांना अधिकार आहे, तो आपण सर्वांच्या प्रयत्नाने व मदतीने त्यांना मिळाला पाहीजे. या निमित्ताने बालमजुरी मुक्त महाराष्ट्र या मोहिमेमध्ये सुध्दा जागरुक नागरीक म्हणुन सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन सरकारी कामगार अधिकारी म.तु. जाधव यांनी केले आहे.

♦ या अनुषंगाने जिल्ह्यामध्ये विविध व्यापारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकांचे आयोजन करुन त्यामध्ये जिल्ह्यातील दुकाने, हॉटेल, व्यापारी संस्था व इतर सर्व आस्थापनांच्या व्यापारी बंधुना बालकामगार या अनिष्ट प्रथेविरुध्द माहिती देवून तसेच त्यांना बाल मजुरी निर्मुलनाचे महत्व समजावुन सांगण्यात येवुन जनजागृती करण्यात येणार आहे.

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा खामगाव दौरा

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन



**बुलडाणा, दि.11 :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे गुरुवार, दिनांक 12 जून 2025 रोजी खामगाव जि. बुलडाणा दौऱ्यावर येत आहे.

त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे : गुरुवार दिनांक 12 जून रोजी दुपारी 4.45 वाजता अकोला येथून शासकीय विश्रामगृह, खामगाव येथे आगमन व नागरिक, कार्यकत्यांच्या भेटीसाठी राखीव. सायंकाळी 6 वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर परिषद मैदान, खामगाव जि.बुलढाणा येथे आगमन व कार्यकर्ता मेळावास उपस्थिती. रात्री 8 वाजता देवजी खिमजी मंगल कार्यालय, खामगाव जि. बुलढाणा येथे आगमन व पत्रकार परिषदसाठी उपस्थिती. रात्री 8.45 वाजता राखीव. त्यानंतर सोईनुसार शेगाव जि. बुलढाणाकडे प्रयाण व मुक्काम.

## पालकमंत्री मकरंद पाटील यांचा जिल्हा दौरा

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन



**बुलढाणा, दि.11 :** राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद पाटील हे दि. 11 व 12 जून 2025 रोजी बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येत आहेत.

त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार बुधवार दि. 11 जून रोजी मुंबई येथून शासकीय विश्रामगृह, बुलढाणा येथे सोईनुसार आगमन व राखीव. गुरुवार दि. 12 जून रोजी दुपारी 1 ते 2 वाजेपर्यंत शासकीय विश्रामगृह येथे अभ्यांगतांसाठी राखीव.

सोईनुसार दुपारी बुलढाणा येथून खामगावकडे प्रयाण व राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या कार्यक्रमास उपस्थिती. त्यानंतर सोईनुसार पुणेकडे रवाना होतील.

## डोणगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**डोणगाव येथे दि. ११ :** जुनला शासनाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर आयोजित करण्यात आले होते यावेळी मेहकर तहसील कार्यालयाचे नायब तहसीलदार सुरेंद्र कावळे बुलढाणा क्रृषी विज्ञान केंद्राचे डॉ. झापे तसेच माजी पं. स. सभापती तथा उबाठाचे शिवसेनेचे तालुकाप्रमुख निंबाजी पांडव माजी ग्रामपंचायत सदस्य उत्तमराव परमाळे पंचायत समिती चे विस्तार अधिकारी संदिप मेटांगळे भगवान बाजड नाजीमभाई कुरेशी भाजपाच्या ज्योतीताई बुरखंडे मंडळ अधिकारी चनखोरे क्रृषी पर्यवेक्षक बोरडे माजी सरपंच जुबेर खान क्रृषी विभागाचे विजय सरोदे आदी मान्यवर उपस्थित होते.



आरोग्य विभागाबाबतच्या विविध योजना बाबत आरोग्य सहायक शिवशंकर बळी यांनी माहीती दिली तर अंगणवाडी बाबत ही पर्यवेक्षिका लेकुरवाळे ताई यांनी माहीती दिली तर नायब तहसीलदार कावळे यांनी शेतकऱ्यांनी अँग्री स्टॅक उपक्रम व फार्मर आयडी याबाबत सखोल मार्गदर्शन केले. यावेळी शेतकरी यांनी शेतरस्त्यांचा प्रश्न याबाबत समस्या मांडल्या तर अनेकांनी डोणगाव येथील क्रृषी सहाय्यक विशिष्ट लोकांना योजनाबाबत माहीती देतात व सर्वसामान्य शेतकरी यांना कोणत्याही प्रकारची माहिती देत नाहीत व भेटत नसल्याच्या तक्रारी केल्या.

ज्यादा दराने सेतुचालक घेत असलेले पैसे व शेतकरी यांना व्यवस्थित माहिती देत नसल्याच्या तक्रारी ही शेतकरी यांनी केल्या एवढेच नव्हे तर पुरवठा विभागाचा एकही अधिकारी सदर समाधान शिबीर स्थळी हजर नसल्याने अनेकांचे राशन कार्ड व नावे याबाबत समाधान होऊ शकले नाही. महसूल विभाग सह सर्व विभागाचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

यावेळी विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आले या समाधान शिबीराचे यशस्वी नियोजन डोणगाव चे तलाठी अमोल राठोड अनुप नरोटे पल्लवी गुंठेवार सिमा चव्हाण भुषण खिल्लारी तसेच कोतवाल संदीप परमाळे संतोष मानवतकर नागेश मानवतकर सह महसूल चे कर्मचारी तसेच डोणगाव येथील सेतुचालक यांनी केले. यावेळी या समाधान शिबीरात शेकडो शेतकरी उपस्थित होते.

♦ यावेळी संत्रा पिक व त्यावर येणारे रोग याविषयी बुलढाणा क्रृषी विज्ञान केंद्राचे डॉ अमोल झापे यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले तर सध्या डोणगाव येथे जे अवैध पणे गांजा व इतर अंमली पदार्थ विक्री होत आहे याबाबत डॉन (ड्रग्जमुक्त भारतासाठी ड्रग्ज बाबत जागरुकता आणि आरोग्याबाबत मार्गदर्शन योजना, २०२५ व ड्रग्ज सेवनामुळे होणा-या शारीरीक मानसिक दुष्परीणामाबाबत जनजागृती ड्रग्ज पिडीत व त्याच्या कुटुंबियांना कायदेशीर सल्ला व सहाय्य देणे व ड्रग्ज पिडीत याचे पुर्नवसनाकरीता कार्य करणे, ड्रग्ज पिडीतांच्या मदतीकरीता नालसा हेल्पलाईन नंबर १५१००, ड्रग्ज संबंधी गुन्हांची माहिती देण्याकरीता राष्ट्रीय अंमली पदार्थ केंद्राचे हेल्पलाईन नंबर १९३३ व ड्रग्ज पिडीताचे पुर्नवसन व समुपदेशन करीता हेल्पलाईन नंबर १४४४६ ची माहीती व तळागाळातील लोकांकरीता कायद्याबाबत माहिती व जागरुकता उपक्रम) योजना, २०२५ याबाबत सखोल मार्गदर्शन मेहकर तालुका विधि सेवा समितीचे अँड. ओम भालेराव यांनी शेतकरी यांना मार्गदर्शन केले.

## दादाभ अभंग यांना ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार’

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते प्रदान

● दिव्य मातृछाया
● सागर सिरसाट

**मुंबई :** भीमा कोरेगाव विजयस्तंभ अतिक्रमण व जागेचा मालकी हक्क ही प्रशासकीय व न्यायालय लढाई मागील पंधरा वर्षे लढत असलेले व विविध वृत्तपत्रातून स्तंभलेखन करून जनजागृती आणि सामाजिक प्रबोधन करणारे दादाभाऊ अभंग यांना महाराष्ट्र सरकारचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मंगळवार दिनांक १० जून रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे प्रदान करण्यात आला.



यावेळी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, मंत्री भरत गोगावले, मंत्री संजय राठोड, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ हर्षदीप कांबळे उपस्थित होते.

दादाभाऊ अभंग हे महाराष्ट्रातील प्रसिद्ध स्तंभलेखक व राजकीय विश्लेषक असून त्यांनी महाराष्ट्रातील विविध वृत्तपत्रातून प्रचंड असे लेखन करून सर्वसामान्य माणसांना न्याय देण्यासाठी व त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात सरकार पातळीवर वाचा फोडण्याचे काम केले आहे.

शेतकरी, कामगार , मजूर, महिला, अपंग व इतर सामाजिक घटकांना न्याय मिळावा यासाठी त्यांनी सतत वृत्तपत्रातून लेखन केले आहे. ते महापुरुषांच्या विचारधारेवर चालणारे एक स्वाभिमानी आणि विचारवंत म्हणून त्यांची महाराष्ट्रामध्ये ओळख असून ते प्रसिद्ध स्तंभलेखक राजकीय विश्लेषक व निर्भीड व्याख्याते आहेत. मागील पंधरा वर्षापासून भीमा कोरेगाव विजयस्तंभ अतिक्रमण प्रशासकीय व न्यायालयीन लढा लढत असून महाराष्ट्र शासनाने त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्रदान केला आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार घोषित झाल्यानंतर त्यांच्या अनेक चाहत्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

♦ **दादाभाऊ अभंग :** भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल दादाभाऊ अभंग यांनी सांगितले की या पुरस्कारासाठी मला अनेकांनी सहकार्य केले त्यांचे मी आभार मानतो. भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा हा पुरस्कार मला मिळाला त्याचा मला खूप आनंद आहे आणि मी हा पुरस्कारर भीमा कोरेगाव येथे १ जानेवारी १८१८ रोजी लढलेल्या सर्व शूरवीर सैनिकांना, माझे आई वडील तसेच माझ्यावर प्रेम करणारे मला नेहमी साथ देणारे आणि माझ्या सोबत असणारे सर्व सहकाऱ्यांना मी हा भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार अर्पण करत आहे.

## एमपीएससी कडून मोठी जाहिरात

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन




**नागपूर :** महाराष्ट्र लोकसेवा आयोग अर्थात एमपीएससीच्यावतीने अनेक दिवसांपासून कुठल्याही परीक्षेसाठी जाहिरात देण्यात आलेली नाही. त्यामुळे स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी चातकासारखे जाहिरातीची वाट बघत होते. त्यामुळे एमपीएससीने अनेक दिवसांनंतर एका विभागाची पदभरती जाहीर केली आहे. यामुळे विद्यार्थ्यांना आता अर्ज करता येणार आहे. दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या वतीने गट क पदाच्या १३७ पदांसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे.

यासाठी उमेदवारांना ३० जूनपर्यंत अर्ज करता येणार आहे. अखेर आयोगाने जाहिरात प्रसिद्ध केल्याने विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी अर्ज करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. गृह विभागाच्या अधिनस्त केवळ राज्य उत्पादन शुल्क लिपिक संवर्ग व जवान संवगांतील खालील पदावरील कर्मचारी प्रस्तुत परीक्षेस पात्र असतील :-लिपिक संवर्ग : लिपिक, वरिष्ठ लिपिक, लिपिक-टंकलेखक, टंकलेखक, लेखापाल व टिप्पणी सहायक जवान संवर्गः जवान, जवान-नि-वाहनचालक, पेटी आफिसर, सहायक दुय्यम निरीक्षक.

DAILY DIVYA MATURCHHAYA -Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by Shaikh Sadik Shaikh katthu Qureshi Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at At.Post. Malipeth, Imam Baba Chowk Mehkar, Tq.Mehkar, Dist. Buldana-443301(Mah.)
Editor SHAIKH SADIK SHAIKH KATTHU QURESHI Mob.No.9420647272 RNI.NO.MAHMAR/2022/87711
हे प्रकाशक, मालक शेख सादीक शेख कठ्ठु कुरेशी यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर-जि.बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मु.पो.माळीपेठ, इमाम बाडा चौक, मेहकर, ता. मेहकर, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक- शेख सादीक शेख कठ्ठु कुरेशी मोबा.9420647272 पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादिववाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत
(टिप:- प्रकाशित झालेल्या जाहिरातीची जबाबदारी प्रकाशकाची नाही.)

# विकी मुख्यदल आनंतात विलीन

## मूळ गावी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

● दिव्य मातृछाया
● विजय जाधव

**देऊळगावराजा :** तालुक्यातील जुमडा गावचे सुपुत्र विकी बाबासाहेब मुख्यदल हे मुंबईत जीआरपी रेल्वे पोलीस विभागात कार्यरत होते. परंतु ज्या रेल्वेची सुरक्षा करायची त्याच रेल्वेच्या गर्दीचे विकी बाबासाहेब मुख्यदल हे बळी ठरले आहेत.

दोन लोकल रेल्वे एका वळणावर आल्यानंतर स्प्रिंगचा दबाव व वळणाच्या दबावामुळे दोन्ही रेल्वेमधील अंतर कमी होते ही तांत्रिक अडचण आहे. ती दुरुस्त करावी लागेल त्या ठिकाणी व फूडपॅडवर दरवाजाजवळ प्रवास करत असणारे प्रवासी यांना झकोला बसतो. त्यातच बाजूने जाणाऱ्या रेल्वेतील प्रवाशांच्या बॅगचासुद्धा धक्का या प्रवाशांना लागलो. अशा वेळेस एकमेकांना घासून दहा प्रवासी पडतात, पैकी सहा मृत्यू पडले. त्यातीलच रेल्वे पोलीस कर्मचारी म्हणजे विकी बाबासाहेब मुख्यदल. अगदी तरुण वयात अशी घटना घडणे ही खरोखरच दुर्दैवी गोष्ट आहे. विकी मुख्यदल यांचेवर आज १० जून जुमडा येथील गावी शासकीय इतमामात व अत्यंत शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

ज्या रेल्वेच्या सुरक्षेची जबाबदारी त्याच रेल्वेच्या गर्दीचा बळी विकी बाबासाहेब मुख्यदल ठरला. रेल्वेच्या संख्या वाढणार नाही, रेल्वेचे डबे वाढणार नाही, रेल्वेतील गर्दीही कमी होणार नाही आदी समस्या भेडसावत असतांना रेल्वे प्रशासनाचे धोरण जेव्हा बदलेल तेव्हा बदलेल, परंतु माणुसकी म्हणून दरवाजात येणाऱ्या प्रत्येक प्रवाशाला स्वतः मागे झुकत आत घेणे ही माणुसकी प्रत्येक रेल्वे प्रवाशाने जपली पाहिजे. एक रेल्वे प्रवासी आज कर्तव्यावर शहीद झाला हे खूप मोठे दुर्दैव आहे.

परंतु अजून कोणी विकीचा बळी जायला नको असे कमलाकर चंदनशिवे म्हणाले, माजी सैनिक पोलीस दिनकर चंदनशिवे, कमांडो पद्माकर चंदनशिवे, पोलीस पाटील सुधाकर चंदनशिवे व कमलाकर चंदनशिवे यांनी बुटखेडा येथे मोठ्या थाटामाटात दिपालीचं विकीसोबत लग्न लावलं. संसारवेल फुलली पण बहरण्याअगोदरच काळाच्या दुर्दैवी घटनेने तीन वर्षाच्या चिमकुल्या प्रणयला पोरके केले. ही दुर्दैवी घटना कानी पडल्यापासून सर्व जुमडावासी व सर्व नातेवाईक दुःखसागरात बुडाले होते. आज सकाळीच भिवगाव पासून ते जुमडापर्यंत तिरंगा घेऊन देशभक्ती गीतात व गगनभेदी देशभक्ती घोषणात दोन तास रॅली चालली. अनेकांनी पुष्पचक्र वाहून श्रद्धांजली अर्पण केली.

♦ सदर दुर्दैवी घटना समजताच गावावर शोककळा पसरली. वडील बाबासाहेब व सासरे कमलाकर चंदनशिवे दोन्ही मिस्त्री काम करतात. परिस्थिती हलाखीची. मुलाने खूप मेहनत केली, प्रॅक्टिस केली, देऊळगावराजा शहरामध्ये दोन वर्ष होमगार्ड नोकरी केली. नंतर रेल्वे पोलीस मुंबई येथे नोकरी लागली. दोन वर्ष भाड्याच्या खोलीत राहून कल्याणला एक घर घेण्याचे स्वप्न पूर्ण केलं. पत्नी दिपाली, मुलगा प्रणय यांचेसोबत पाच जूनला विकीचा वाढदिवस साजरा झाला. सुखाचे दिवस आले होते. रात्रीची ड्युटी करून परत येण्याचा फोन विकीने केला आणि ते शेवटचेच बोलणे ठरले..!







### हजारोंच्या संख्येने समुदाय अंत्यविधीसाठी उपस्थित होता

♦ बुलडाणा जिल्हा पोलीस पथकाने शासकीय इतमामात बिगुल वाजवून सलामी दिली. हवेत तीन फेरी गोळ्या झाडून सलामी शस्त्रासह रायफलला संगीन लावून सलामी दिली. चिमुकल्या तीन वर्षाच्या प्रणयने चिता अग्रीडाव दिला. याप्रसंगी सर्व जनसमुदायाचे हृदय पिळवटून गेले व आसवांच्या धारा प्रत्येकाच्या डोळ्याला लागल्या होत्या, सर्वत्र वातावरण शोकाकूल झाले होते.

♦ यावेळी तहसीलदार वैशाली डोंगरजाळ, ठाणेदार आशिष रोही, डॉक्टर रामप्रसाद शेळके, सतीश कार्यदे, दादाराव खार्डे, दिलीप खरात, श्रीमंत पांडव, दिनकर चंदनशिवे, पद्माकर चंदनशिवे, भीमराव चाटे माजी सैनिक, राजीव शिरसाट, अनेक राजकीय, शैक्षणिक, अधिकारी, पुढारी यांचेसह परिसरातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या २६व्या वर्धापन दिनानिमित्त सुलतानपूर ग्रामीण रुग्णालयात बिस्किट वाटपाचा उपक्रम

● दिव्य मातृछाया
● शेख इमरान

**सुलतानपूर :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २६व्या वर्धापन दिनानिमित्त सुलतानपूर येथील ग्रामीण रुग्णालयात सामाजिक जाणीवेने बिस्किट वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी - शरद पवार गटाचे बुलढाणा जिल्हा उपाध्यक्ष सदानंद तेजनकर पाटील यांच्या पुढाकाराने आणि मार्गदर्शनाखाली पार पडला.

या सामाजिक उपक्रमात रुग्णालयातील रुग्ण, त्यांचे नातेवाईक यांच्यात बिस्किटांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामार्फत राष्ट्रवादी काँग्रेसने सामाजिक बांधिलकीची जाणीव दाखवून दिली.

या उपक्रमात सुरज साठे, हर्षल इंगोले, बंडू पडघान, वसीम पहेलवान, शुभम सिरसाट, सुरज सरकटे, सुरज लहाने, जुबेर शेख यांच्यासह गावातील नागरिक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. उपस्थितांनी उपक्रमाचे कौतुक केले असून, अनेकांनी अशा उपक्रमांचे सातत्य ठेवावे अशी अपेक्षा व्यक्त केली.



♦ कार्यक्रमात बोलताना सदानंद पाटील म्हणाले, “राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा जनतेच्या सेवेसाठी व समाजहितासाठी सदैव कार्यरत आहे. बिस्किट वाटप ही एक छोटीशी पावती असली तरी तिच्यामागे मोठा सामाजिक उद्देश आहे.”

---

# मलकापूर पांग्रा येथील प्रधानमंत्री आवास योजनेच्या २७५ लाभार्थ्यां पैकी आज पर्यंत ११५ फाईल मिशन मोडवर


## ग्रामपंचायत अधिकारी सरपंच व कर्मचारी बारा तास कामांमध्ये व्यस्त

● दिव्य मातृछाया
● वसीम शेख

**मलकापूर पांग्रा :** मलकापूर पांग्रा येथे प्रधानमंत्री आवास योजनेची २७५ उद्दिष्टपैकी लाभार्थ्यांपैकी आजपर्यंत मिशन मोडवर ११५फाईली तयार करण्यात आल्या असून पंचायत समितीला मंजुरीसाठी पाठवण्यात आलेले आहेत.

ग्रामपंचायत अधिकारी, सरपंच, ग्रामपंचायत सदस्, ग्रामपंचायत कर्मचारी सकाळी सात ते संध्याकाळी सात पर्यंत ग्रामपंचायत मध्ये बसून लाभार्थ्यांच्या फाईल तयार करून घेत आहे आणि मिशन मोडवर प्रथम प्राधान्याने घरकुलाचे काम करीत आहे सदर बाबी मध्ये काही तांत्रिक अडचणी येत आहेत त्यामध्ये काही लाभार्थ्यांचे नावे अतिक्रमित जागा असून त्यामध्ये सदर लाभार्थ्यांना जर त्यांच्या अतिक्रमण २०११ पूर्वीचे असेल तर तसा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत.

पात्र लाभार्थ्यांना जास्तीत जास्त कसा फायदा होईल व पात्र लाभार्थ्यांची प्रस्ताव तात्काळ पंचायत समितीला सादर करण्यात यावा याबद्दल पंचायत समिती सिंदखेड राजा गटविकास अधिकारी अंकुश मस्के यांनी मलकापूर पांग्रा ग्रामपंचायत अधिकारी व सरपंच यांना सूचना दिल्या. यावेळी सरपंचपती यादव आप्पा टाले, घरकुल अभियंता श्री सरोदे, ग्रामपंचायत निरक्षण अधिकारी परमेश्वर दानवे ग्रामपंचायत कर्मचारी पांडुरंग कापसे, अरशद शेख, नंदकुमार साळवे, परमेश्वर आटोळे गणेश बावरे उपस्थित होते.



“ तरी या व्यतिरिक्त कोणतेही यादीत आपले नाव नसलेले पात्र लाभार्थी यांनी प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ घेण्यासाठी दिनांक १८ जून पर्यंत सेल्फ सर्वेची मुदत वाढवून आहे. तरी उर्वरित सर्व पात्र लाभार्थ्यांनी सेल्फ सर्वे करावा असे ग्रामपंचायतच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे.

– **उद्धव गायकवाड,** ग्रामपंचायत अधिकारी मलकापूर पांग्रा

♦ सदर लाभ यादीतील घरकुल लाभार्थ्यांनी आपले घरकुलाचे कागदपत्रे व माहिती ग्रामपंचायत कार्यालयात येत्या दोन दिवसात सादर करण्यात यावी व ज्या लाभार्थ्यांना जागा नाही किंवा त्यांच्या अतिक्रमण २०११ पूर्वीचे आहे अशांनी अतिक्रमण नियमाकूलची फाईल सादर करावी असे आवाहन ग्रामपंचायत अधिकारी उद्धव गायकवाड व सरपंच सौ पार्वती यादव टाले यांनी केले.

♦ सदर मिशन मोड कामासाठी १० जून रोजी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अंकुश मस्के विस्तार अधिकारी राजेश्वर पवार विस्तार अधिकारी श्री घुगे विस्तार अधिकारी दराडे यांनी भेट देऊन मलकापूर पांग्रा ग्रामपंचायतचे कौतुक केले

---

# एक सॅल्यूट, हजार स्वप्नांची पूर्तता!

## राजगुरुनगरच्या उपक्रमातून २२ विद्यार्थ्यांचा पोलीस सेवेत अभूतपूर्व यशप्रवास!

## प्रकाश शिंदे यांचा ‘पोलीस भरती विशेष उपक्रम’ ठरतोय यशाचा महामार्ग!

## आतापर्यंत ४५ हून अधिक विद्यार्थी महाराष्ट्र शासनाच्या सेवेत रुजू!

● दिव्य मातृछाया
● सुरेश हुसे

**सिंदखेड राजा :** आपल्या डोळ्यांपुढे एखाद्या विद्यार्थ्याने सॅल्यूट करत आदराने मान झुकवली की, कोणत्याही मार्गदर्शकाच्या डोळ्यांत पाणी यावं हे स्वाभाविकच आहे. असाच एक अविस्मरणीय क्षण राजगुरूनगर (पुणे) येथील प्रकाश चंद्रकांत शिंदे यांच्यासाठी लातूरच्या बाभळगाव येथे पार पडलेल्या पोलीस दीक्षांत समारंभात घडला.

हितेश सुतार या विद्यार्थ्याने आपल्या गुरुबंधू शिंदे यांना वर्दी घालून केलेला सॅल्यूट हा केवळ व्यक्तिगत सन्मान नव्हता, तर त्यांच्या अथक परिश्रमांची पावती होती.

एक संकल्प आणि शंभर स्वप्नांची दिशा!’

2022-23 च्या पोलीस भरती मध्ये आम्ही आमच्या राजगुरूनगर (पुणे) येथील राजाराम गावडे अभ्यासिका मध्ये एक छोटासा उपक्रम राबवला होता पोलीस भरती करणाऱ्या विध्यार्थ्यांसाठी तो म्हणजे, मी लायब्ररीमध्ये अभ्यास करत असताना पोलीस भरती अभ्यास करणाऱ्या मुलांना खूप जवळून पाहिलं, त्यातील बऱ्याच मुलांच्या खूप चांगल्या ओळखी झाल्या होत्या, सागर मेठल नावाचा एक खूप होतकरू, प्रामाणिक, जिद्दी मुलगा मला भेटला, त्या मुलासाठी काहीतरी करावं अशी भावना मनामध्ये निर्माण झाली, आणि यांच्यासाठी काहीतरी करायचं हे ठरवलं आणि लायब्ररीचे संचालक आनंद शिंदे सर यांना याबद्दल माहिती दिली त्यांनी सुद्धा या उपक्रमाला होकार दिला आणि या उपक्रमाचा जन्म झाला.

Telegram च्या माध्यमातून लायब्ररी मधील तसेच लायब्ररी बाहेरील होतकरू 60 विद्यार्थ्यांचा ग्रुप बनवला , माझ्या मोकळ्या वेळेत हा सगळा उपक्रम राबवला,या 60 विध्यार्थ्यांमध्ये एक स्पर्धा ठेवली 42 दिवसांची (6 आठवड्यांची), रोजच्या मार्कवरून प्रत्येक आठवड्याला 2 winner काढायचे असे एकूण 12 winner काढले, तसेच शेवटी ज्यांनी best परफॉर्मन्स दिला त्यांना 15 पुस्तक gift दिले.

या उपक्रमासाठी मला आपल्या एकूण 60 विद्यार्थ्यांना प्रत्येकी 1 असे एकूण 60 रजिस्टर लागणार होते, मी माझ्या मोठ्या भावाला म्हणजेच दत्ता भैय्या सुनूपे (सरपंच) यांना उपक्रमाबद्दल माहिती दिली त्यांनी लगेच मला 60 रजिस्टर उपलब्ध करून दिले आणि अजून काही लागेल तर सांग असं सुद्धा आवर्जून सांगितले, तसेच या उपक्रमांमध्ये मला 6 तात्याचा ठोकळा हे पुस्तक लागणार होते, आमच्या उपक्रमाची माहिती माझ्या मित्राला म्हणजेच स्वप्निल देशपांडेला कळाली तेव्हा त्यांनी हे सर्व सहा पुस्तके आम्हाला gift दिले, तसेच मी 22 पुस्तके विद्यार्थ्यांना त्यांनी केलेल्या कष्टाबद्दल प्रोत्साहन म्हणून बक्षीस दिली.

190+ पेपर च्या माध्यमातून या सर्व साठ विद्यार्थ्यांचा सराव करून घेतला होता, रोज 200 प्रश्न त्यांच्याकडून सोडून घेतले आणि नंतर तेच सोडवलेले सर्व प्रश्न आपण दिलेल्या register मध्ये त्यांच्याकडून रोज लिहून घेतले, विध्यार्थी रोज होमवर्क पूर्ण करतो का नाही हे तपासण्यासाठी लायब्ररीतील माझे सहकारी आनंद शिंदे सर, चैतन्य बोराडे, आकाश दौंडकर आणि इतर काही मुलं प्रामुख्याने आपापली जबाबदारी पार पाडत होते.

या 190+ पेपरची Quiz (प्रश्नमंजुषा) बनवण्यासाठी आमची एक टीम काम करत होते त्यामध्ये प्रामुख्याने राहुल वायाळ, अमोल साबळे, रोहन भांबुरे, आकाश दौंडकर, समीर भोकसे, हितेश सुतार, राजेंद्र करवंदे इत्यादी मित्रांनी खूप मेहनत घेतली आणि या सर्व प्रश्नपत्रिकांची Quiz तयार केली.

या उपक्रमाचा फायदा असा झाला की प्रश्नपत्रिका रोज सोडवायची आणि तेच प्रश्न रोज लिहून काढायचे, जवळपास 42 दिवस सरासरी 200 प्रश्न मुलांनी रोज लिहून घेतले, सुरुवातीला लिहायला त्यांना त्रास वाटायचा नंतर हळूहळू सवय झाली आणि त्या सवयीचा रूपांतर त्यांच्या अभ्यासाच्या गतीमध्ये झाली आणि त्याचे फळ निश्चितच त्यांना भेटणार होते आणि ते फळ त्यांना जवळपास भेटलेच, उपक्रमाअगोदर ज्या विध्यार्थ्याला 45-50 मार्क पडत होते त्याने 75-80 मार्क घेतले आहेत, मार्कांमध्ये चांगल्या प्रमाणात वाढ झाली आणि अभ्यासाची गोडी वाढली हे या उपक्रमाचे सर्वात मोठे यश म्हणायला हरकत नाही.

या आपल्या उपक्रमातील 60 विद्यार्थ्यांपैकी आज महाराष्ट्र पोलीस मध्ये, साहिल सांडभोर, आकाश दौंडकर,साक्षी रेटवडे, सुकन्या जमादार,अश्विनी रणखांबे,मोनिका शेळके,कोमल टाकळकर,अश्विनी बोरकर,प्रतीक्षा कुडेकर,सागर मेठल, संतोष भोगाडे,माधुरी भगाडे,गणेश जगताप, हितेश सुतार इत्यादी.

यातील संतोष भोगाडे सर हे Ex. Servicemen आहेत, त्यांनी आपल्या उपक्रमाचे रजिस्टर एका विद्यार्थिनी कडून घेऊन अभ्यास केला आणि पंधरा ते वीस मार्कांची त्यांना लीड मिळाली आणि त्यांची ओपन कॅटेगिरी मधून मुंबई पोलीस मध्ये निवड झाली, तसेच आपल्या या उपक्रमाचे रजिस्टर वापरून अजून 3 ते 4 बाहेरील विद्यार्थी यांचीसुद्धा मुंबई

### सिंदखेडराजा येथे उपक्रम राबवण्यास सज्ज!

♦ या उपक्रमाची माहिती उपविभागीय अधिकारी मा. संजय खडसे व तहसीलदार अजित दिवटे यांना मिळाल्यानंतर त्यांनी तो सिंदखेडराजा येथेही राबवण्याची इच्छा व्यक्त केली आहे. स्थानिक नगरसेवक व समाजातील प्रतिष्ठित व्यक्तींसुद्धा या कार्यास सहकार्य करणार आहेत.

“ "मी मोठं काही केलं नाही, पण कोणाच्या जीवनात काही बदल घडवता आला तर त्याला खरे यश म्हणतात!"

– **प्रकाश चंद्रकांत शिंदे,** भूमापक, भूमि अभिलेख, सिंदखेडराजा



















# समृद्धी महामार्गावरून धडधडीत अवैध रेती वाहतूक सुरू!

## बॅरिकेट तोडून टिप्परची सर्रास धाव! प्रशासन, पोलिस आणि महसूल विभाग 'निर्लज्जपणे' गप्प!

● दिव्य मातृछाया
● सुरेश हुसे



**सिंदखेड राजा :** बुलढाणा जिल्ह्यातील हिवरखेड पूर्णा परिसरातून बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावर चॅनल नंबर ३२२ जवळ १६ पेक्षा अधिक दोन ब्रास टिप्परद्वारे धडधडीत अवैध रेती वाहतूक सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव उघड झाले आहे. या टिप्पर चालकांनी महामार्गावरील सुरक्षात्मक बॅरिकेट्स तोडून थेट मुख्य रस्त्यावर प्रवेश करून रेती वाहतूक सुरू ठेवली आहे.

यात सर्वात गंभीर बाब म्हणजे ही अवैध वाहतूक स्थानिक पोलीस, महसूल विभाग व समृद्धी महामार्ग पोलीस यांच्याच आशीर्वादाने सुरू आहे, असा थेट आरोप स्थानिक ग्रामस्थांनी केला आहे.

महसूल व पोलिस प्रशासनाचे आर्थिक संमतीने सुरू रेती 'कारस्थान'!

हिवरखेड पूर्णा येथील स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, अवैध रेती वाहतूक ही स्थानिक तलाठी, मंडळ अधिकारी व पोलिसांच्या 'आर्थिक लाचारी'मुळे सुरू आहे. यामुळे शासकीय यंत्रणा केवळ बघ्याची भूमिका बजावत असून त्यांच्याकडून कोणतीही कारवाई केली जात नाही. नागरिकांच्या तक्रारी आणि सामाजिक कार्यकर्ते यांनी सातत्याने याबाबत प्रश्न उपस्थित करूनही संबंधित विभागांनी दुर्लक्षच केले आहे.

## "मृत्यू महामार्ग" बनलेल्या समृद्धी मार्गावर भीषण अपघाताच्या छायेत जनतेचा जीव धोक्यात!



### "एखाद्या मोठ्या अपघाताची वाट बघताय का?" – संतप्त नागरिकांचा सवाल

♦ स्थानिक नागरिकांनी प्रशासनाला जाब विचारत म्हटले आहे की, "आमच्या जीवाची काहीच किंमत नाही का? अपघात घडल्यावरच कारवाई करणार का?" अशा बेधडक कारवायांमुळे समृद्धी महामार्ग सामान्य नागरिकांसाठी धोकादायक ठरत आहे. त्वरित कारवाई न झाल्यास बळी गेलेल्यांच्या मृत्यूला जबाबदार कोण?

### समृद्धी महामार्ग का बनतोय 'मृत्यू महामार्ग'?

♦ हिवरखेड पूर्णा येथील ई-क्लास जमिनीवरील समृद्धी महामार्गाचे चॅनल नंबर ३२२ हे ठिकाण सध्या अवैध रेती टिप्परांचा गड बनले आहे.

♦ बॅरिकेट तोडून भरधाव वेगाने जाणारे टिप्पर, जंगली प्राण्यांचा अधिवास, आणि महामार्गावर येणाऱ्या सामान्य वाहनांमध्ये कोणत्याही क्षणी भीषण अपघात होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

### वारंवार वृत्त प्रसिद्ध होऊनही MSRDC गप्प!

♦ दैनिक दिव्य मातृछाया आणि इतर माध्यमांतून वारंवार वृत्त प्रकाशित करूनही आजपर्यंत एमएसआरडीसी, महामार्ग पोलीस किंवा महसूल विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. हे प्रशासनाचे ढोंग आणि जनतेच्या सुरक्षेकडे असलेले गंभीर दुर्लक्ष दर्शवते.

# तर मंत्र्यांना महाराष्ट्रात फिरू देणार नाही - रविकांत तुपकर

## कर्जमुक्ती व पीकविम्यासाठी शेतकऱ्यांचा शेगावातून एल्गार!

## तुपकरांची बैलगाडीतून शेगावात मिरवणूक! शेतकऱ्यांनी केले जंगी स्वागत

● दिव्य मातृछाया
● सागर शिरसाट

**शेगाव, दि.10 :** सोयाधीन, कापूस आणि कांद्याला भाव नाही. उसाचाही प्रश्न बिकट आहे. नुकसानभरपाई नाही. पेरणीच्या तोंडावर पीककर्ज मिळाले नाही. कर्जमाफी तर मिळालीच नाही. अशा परिस्थितीत आज राज्यातील शेतकरी संकटात आहेत. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी एल्गार पुकारला आहे. सरकारने शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले तर येणाऱ्या काळात मंत्र्यांना महाराष्ट्रात फिरू देणार नाही, असा गंभीर इशारा शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी संतनगरी शेगाव येथे दिला.



### तुपकरांची बैलगाडीतून मिरवणूक

एल्गार मेळाव्यासाठी शेगावात दाखल झालेल्या रविकांत तुपकरांची परिसरातील शेतकऱ्यांनी सजवलेल्या बैलगाडीतून मिरवणुक कढत जंगी स्वागत केले. यावेळी शेगाव शहरातील अनेक व्यापारी स्वागतासाठी रस्त्यावर होते. रविकांत तुपकरांनी स्वतः बैलगाडी चालवत, धुरकरी होत बैलगाडीच्या रथाचे सारथ्य केले व बैलगाडी चालवतच ते सभास्थळी पोहचले.

### सरकारला सुबुद्धी देण्याची 'श्रीं' चरणी प्रार्थना

♦ या मेळाव्यापूर्वी रविकांत तुपकर यांनी संत गजानन महाराज मंदिरात जाऊन श्रींचे दर्शन घेतले. यावर्षी पाऊस वेळेवर वेळेवर येऊ द्या, पिके चांगली राहू दे आणि शेतकऱ्यांच्या घरात चांगले उत्पन्न येऊ दे, या सोबतच सोयाबीन आणि कापसाला चांगले दर देण्याची सद्बुद्धी व शेतकऱ्यांची कर्जमुक्ती करण्याची सुबुद्धी या सरकारला दे, अशी प्रार्थना रविकांत तुपकर यांनी संत गजानन महाराजांच्या चरणी केली.

संत नगरी शेगाव येथे क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वात १० मे रोजी एल्गार मंळावा पार पडला.

मेळाव्यात पुढे बोलताना तुपकर म्हणाले की, मी गेल्या २२ वर्षापासून शेतकऱ्यांसाठी संघर्ष करीत आहे, त्याचेच फळ म्हणून या जिल्ह्यातील सर्वसामान्य जनता आणि शेतकऱ्यांनी मला लोकसभेत अडीच लाख मते दिली. एका अपक्ष उमेदवाराने अडीच लाख मते घ्यावी ही बुलढाण्याच्या इतिहासातील पहिलीच वेळ आहे.

घाटाखालील मतदारांनी मला साथ दिली असती तर आज चित्र वेगळे असते, असे सांगून यापुढेही शेवटच्या श्वासापर्यंत शेतकऱ्यांसाठीच लढत राहील, याची ग्वाही दिली. परंतु, ज्यांना निवडून दिलं त्यांनी आजपर्यंत जिल्ह्यासाठी काहीच केलं नाही. आरोग्य मंत्री आहेत परंतु जिल्ह्यातील आरोग्याचा प्रश्न मोठा आहे. केस गळती, नख गळतीबाबत अजूनही संशोधन झालं नाही. ते केंद्रीय मंत्रीचं काय पंतप्रधान जरी झाले तरी या जिल्ह्याचा जे काही भलं करू शकत नाही, असा टोला देखील यावेळी रविकांत तुपकर यांनी लगावला.

निवडणुकीपूर्वी सरकारने कर्जमुक्तीचे आश्वासन दिले होते. त्यामुळे शेतकऱ्यांनी कर्ज भरले नाही. मात्र, आता सरकारने शब्द पाळला नाही, त्यामुळे शेतकरी थकबाकीदार झाले आहेत. वास्तविक कर्जमुक्ती करणे ही सरकारची नैतिक जबाबदारी आहे. त्यामुळे आता सरकारने शेतकऱ्यांचे सरसकट कर्ज माफ केले पाहिजे. तातडीने पिक विमा दिला पाहिजे, सोयाबीनला कापसाला तीन हजार रुपये प्रति क्विटल भाव फरक दिला पाहिजे यासह इतर मागण्या सरकारने वेळेत पूर्ण नाही केल्या तर येणाऱ्या काळात मंत्र्यांना महाराष्ट्रात फिरू देणार नाही, असा ईशारा देखील यावेळी रविकांत तुपकर यांनी दिला.

येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुका होणार आहेत त्यावेळी या सरकारला कर्जमाफीची जाणीव करून देणे आवश्यक आहे. जो कर्जमाफी की बात करेगा, वही स्थानिक स्वराज्य संस्था में राज करेगा, असा नारा आता गावोगावी देण्याची वेळ आली आहे. आपल्या न्याय हक्कासाठी मोठा संघर्ष करण्याची तयारी ठेवा, असे आवाहन देखील तुपकरांनी यावेळी केले. यावेळी ज्येष्ठ नेते वासूदेव उन्हाळे, आर. बी. देशमुख, राजू शेळके, संतोष खेर्डे, विलासराव पाटील, भवगन मोरे, गजानन देशमुख, सदाशिव जाधव, ज्ञानदेव कराळे, अमोल राऊत, अनंता मानकर, अक्षय पाटील, वैभव जाणे, मासूम शहा, आनंदा आटोळे, उमेशसिंग राजपुत, नाना खटके, प्रकाश पाटील, युनूस भाई, वैष्णवी भारंबे, दीपक देशमुख, सचिन शिंगोटे, भागवत धोरण, अनंता शेळके, नीलेश गवळी, वैभव माळी, सेख अस्लम, सुनील अस्वार, श्रीकृष्ण मसुरकर, भास्कर तांदळे, अवी बोरसे, नंदू गावंडे, सोपान खंडारे यांच्या सह हजारो शेतकरी उपस्थित होते.

# जिजाऊ स्मृतिज्योत रथयात्रेचे भव्य आयोजन

## सिंदखेडराजा ते किल्ले रायगड पर्यंत उजळणार जिजाऊंच्या स्मृतींचा जागर

● दिव्य मातृछाया
● अफरोज पठाण

**किनगाव राजा :** राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या ३५१व्या पुण्यतिथीनिमित्त यदुकुलभूषण राजे लखुजीराव जाधवराव प्रतिष्ठानच्या वतीने जिजाऊ स्मृतिज्योत रथयात्रेचे आयोजन करण्यात आले असून, मातृतीर्थ सिंदखेडराजा येथून किल्ले रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या पाचाड येथील जिजाऊ समाधीस्थळापर्यंत ही तीन दिवसीय भव्य यात्रा पार पडणार आहे.

या रथयात्रेचे वैशिष्ट्य म्हणजे, सिंदखेडराजा येथील पाच पवित्र विहिरींतील जल घेऊन, रायगडावरील जिजाऊ समाधीस्थळी जलाभिषेक करून पुण्यतिथी साजरी करण्यात येणार आहे.



### १४ जून रोजी रथयात्रेचे भव्य प्रस्थान

रथयात्रेचा शुभारंभ १४ जून रोजी सकाळी ८.३० वाजता सिंदखेडराजा येथून होणार असून, प्रस्थानप्रसंगी अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यामध्ये केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव, आमदार मनोज कायंदे, सिद्धार्थ खरात, अर्जुनराव खोतकर, माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे, माजी आमदार डॉ. शशिकांत खेडेकर, तोताराम कायंदे, तसेच प्रतिष्ठित संस्था, पक्ष व समाजातील विविध मान्यवर सहभागी होणार आहेत.

### सर्वांना सहकार्याचे आवाहन

या स्मृतिज्योत रथयात्रेत सकल मराठा समाज, जिजाऊ-शिवभक्त, विविध संघटना आणि सर्व नागरिकांनी सहभागी होऊन जिजाऊ माऊलींच्या स्मृतींना अभिवादन करावे, असा आवाहन यदुकुलभूषण राजे लखुजीराव जाधवराव प्रतिष्ठानचे अध्यक्ष भागवतराजे मानसिंग जाधवराव यांनी केले आहे.

### एक ऐतिहासिक सांस्कृतिक सोहळा

जिजाऊ स्मृतिज्योत रथयात्रा ही केवळ एक धार्मिक किंवा श्रद्धेय यात्रा नसून, ती शौर्य, मातृत्व आणि मराठ्यांच्या अस्मितेचा जागर करणारी यात्रा आहे. यामार्फत नव्या पिढीपर्यंत जिजाऊ माऊलींचा त्याग, विचार आणि संस्कार पोहोचवण्याचा उद्देश आहे.

### प्रस्थान मार्ग आणि मुक्काम

**रथयात्रेचा मार्ग पुढीलप्रमाणे आहे :** सिंदखेडराजा → जालना → घनसावंगी → अंबड → गेवराई → बीड → पाटोदा → जामखेड → कर्जत → राशीन → भिगवण → बारामती → फलटण → कळंब → लोणंद → वठार स्टेशन → भुईंज → ओझर्डे → वाई → पाचगणी → महाबळेश्वर → प्रतापगड → पोलादपूर → महाड → पाचाड.

यात्रेचा प्रथम मुक्काम बीड, द्वितीय मुक्काम भुईंज (सातारा) आणि तृतीय मुक्काम महाड (रायगड) येथे होणार आहे.

### भुईंज येथे विशेष स्वागत

♦ रथयात्रा वाई मार्गे जात असल्यामुळे, वाई विधानसभेचे आमदार व महाराष्ट्र राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तसेच बुलडाणा जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंदआबा पाटील यांच्या वतीने भुईंज येथे १५ जून रोजी जिजाऊ स्मृतिज्योत रथयात्रेचे स्वागत व पूजन करण्यात येणार आहे. या स्वागत समारंभाचे आयोजन यदुकुलभूषण प्रतिष्ठानचे अध्यक्ष भागवतराजे मानसिंग जाधवराव यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे.

# डोणगावच्या नागरीकांची पाणीपट्टी माफ

## सावजीच्या बैठा सत्याग्रहाला यश

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**मेहकर :** डोणगाव येथे येथे गत ७वर्षोपासून डोणगाव च्या नळयोजनेतून पाणी पुरवठा होत नसल्याने व करोडो रुपये खर्च होऊन ही डोणगाववासी तहानलेलेच असल्याने ज्या नळयोजनेतून पाणी मिळत नाही त्या गावातील संपूर्ण गावाचीच पाणी पट्टी ग्रामपंचायत ने माफ करावी अशी मागणी राष्ट्रीय कॉंग्रेस चे जिल्हा उपाध्यक्ष शैलेश सावजी यांनी डोणगांव ग्रामपंचायतला केली होती.

यासाठी १० जून ला बैठा सत्याग्रह करण्याचा इशारा दिला होता त्यानुसार १० जून रोजी शैलेश सावजी यांनी ग्रामपंचायत मध्ये बैठा सत्याग्रह सुरू करताच ग्रामपंचायत ने विशेष सभा घेऊन सन २०२१ पासून डोणगाव ला पाणी पुरवठा होत नसल्याने संपुर्ण पाणी पट्टी माफ करण्याचा ठराव घेऊन शैलेश सावजी यांना देण्यात आला त्यामुळे डोणगाव येथील संपुर्ण गावकरी यांची नळाला पाणी न आल्याने सन २०२१-२०२२ पासून पाणीपट्टी माफीचा ठराव घेतला असला तरी डोणगाव वासियांना नळातून पाणी केव्हा मिळणार हा प्रश्न असून यासाठी ही व्यापक सत्याग्रह होणे गरजेचे आहे.



♦ डोणगाव प्रमाणेच जिल्ह्यातील अनेक गावात नळातून पाणी जनतेला मिळत नाही अशा सर्व ग्रामपंचायत ने ही आपल्या गावातील पाणी पट्टी माफ करावी. शैलेश सावजी जिल्हा उपाध्यक्ष कॉंग्रेस बुलढाणा.

# कृषीबरोबरच औद्योगिक क्षेत्रात साताऱ्याची प्रगती; उत्तम पायाभूत सुविधांमुळे गुंतवणुकीला वाव

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**सातारा :** पुणे-बंगळूरु महामार्गावरचा प्रमुख जिल्हा असलेल्या सातारा जिल्ह्याला ऐतिहासिक, धार्मिक, पर्यटन, शेती आणि आता नव्याने औद्योगिक जिल्हा म्हणून ओळख निर्माण होत आहे.

जिल्ह्याचा काही भाग भीमा आणि मोठा भाग कृष्णा नदीच्या खोऱ्यात मोडतो. सह्याद्रीची पर्वत श्रेणी, डोंगरदऱ्या चढउतारांची जमीन आणि सपाटीचे क्षेत्र असे जिल्ह्याचे सर्वसाधारण स्वरूप आहे. जिल्ह्याच्या पश्चिम भागात मोठ्या प्रमाणात पाऊस तर पूर्व भागात दुष्काळ असा प्रदेश आहे. नुकत्याच झालेल्या वळिवाच्या पावसाने या दुष्काळी परिसरात वर्षभर पुरेल इतके पाणी आहे.

जिल्ह्यात विकासासाठी पायाभूत सुविधा निर्माण करून गुंतवणूक व औद्योगिक गुंतवणुकीला पोषक वातावरण निर्माण करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे.